# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १३०/२०१३ मधील नि. क्र. ६८ वरील आदेश
## (दिनांक ११.१२.२०१७)

०१. सदरचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ यांचे वारसांना अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींच्या म्हणण्या प्रमाणे वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादी क्र.३६अ. तानुबाई भाउ राउत ही दिनांक २८.७.२०१३ रोजी मयत झाली असून मयत वारस दाव्यात पुर्वीच सामील आहेत. प्रतिवादी क्र. ४२ सदाशिव गणपत भंडारे हे दिनांक १.६.१९९० रोजी मयत झाले असून मयतास ४२अ ते ४२क हे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ४३ सोपान गणपत भंडारे हे दिनांक २५.११.१९९८ रोजी मयत असून मयतास ४३अ ते ४३ब हे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ४८अ लक्ष्मण बाळू राउत हे दिनांक १३.४.२०१४ रोजी मयत झाले असताना मयतास ४८अ१ नाथा लक्ष्मण राउत असे वारस आहेत. सदरचे वारस अभिलेखावर आणणे न्यायाचे आहे. परंतू वादीस मयताचे मृत्यूचे दाखले व मयताची माहिती वेळेत मिळाली नसलेमुळे मुदतीत वारस अभिलेखावर आणणे राहून गेलेले आहे. सदरचे वारस अभिलेखावर आणणेस वादीने हेतूपुरस्सर अगर जाणुनबुजून विलंब केलेला नाही. न्यायाच्या दृष्टीने वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणे जरुरीचे आहे. अन्यथा वादीची कधीही न भरुनयेणारे नुकसान होणार आहे.. सबब, प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ यांचे वारसांना अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. या अर्जास उजर घेत प्रतिवादींनी आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ६८ खाली मांडले. प्रतिवादींच्या म्हणण्या प्रमाणे वादीचा अर्ज कायदेशीर नाही. वादीने जाणीवपुर्वक विलंब केला आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१. वादीने मागणी केल्याप्रमाणे विलंब माफ होवून मिळणेस पात्र आहे काय ? | .....होय |
| ०२. कोणता आदेश ? | ....अंतिम ओदशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ व २ :**

०५. उभयंताच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्राचे तसेच उभंयताना मान्य असलेल्या बाबी पाहती ही बाब आढळून येते की, प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ हे मरण पावले आहे तेंव्हापासुन ९० दिवसांच्या आत मयताचे वारसांना फलकावर घेवून वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक असतांना वादीने अर्ज दिनांक ०२.०२.२०१७ रोजी दाखल केले. प्रस्तूत दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे सर्व वारसांना फलकावर आणणे आवश्यक आहे.

०६. एकंदरित न्यायाच्या समतोलाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारंसाना वादपत्रात समाविष्ट करणे सुलभ न्यायादानाच्या दृष्टीने देखील आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ याचे वारसांना अभिलेखावर आणण्यास झालेल्या

विलंबाचे कारण हे ग्राहय धरण्यासारखे नाही. परंतू दावा हा स्थावर मिळकतीचा व वाटपाचा असल्यामुळे गुणागुणावर चालण्यासाठी प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारसांना अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. परंतू वादीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारसांना अभिलेखावर आणण्यास विलंब केला आहे. त्यासाठी वादीस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी प्रतिवादींना खर्च/कॉस्ट रु. ५००/– दयावे. यासर्व बाबीचा विचार करुन मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्दा क्र. २ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करण्यात येते.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादीने प्रतिवादीना कॉस्ट रु. ५००/- दिल्यांनतर प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारसांना अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येते.

**(रोहिणी रा. संकपाळ)**

दिनांक ११.१२.२०१७

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt R. R. Sankpal,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 11.12.2017 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 11.12.2017 |